SAI JYOTI

Proceeding of UGC Sponsored
One Day National Seminar

# गांधी विचार धारा और भारतीय जनतांत्रिक मूल्यव्यवस्था

Held on 6th March 2017



Mahatma Gandhi Study Centre
Arts & Commerce Degree College
Petrol-Pump, Jawahar Nagar, Dist-Bhandara
Maharashtra - 441906

# CONTENTS


| Sr.No | Papers | Page No. |
|---|---|---|
| 1. | Voice of Gandhi on Women<br>*Prof. Parag Hedaoo* | 1 - 3 |
| 2. | Educational Philosophy of Mahatma Gandhi<br>*Hemlata R. Selokar* | 4 - 8 |
| 3. | The Impact of Gandhi on Dr. Bhabani Bhattacharyats Novels<br>*Dr. Anita Wanjari* | 9 - 12 |
| 4. | Gandhian Influence on Indian Writings in English<br>*Dr.Ms. Kaneez Banoo Quraishi* | 13 - 15 |
| 5. | Mahatma Gandhi and Khandi<br>*Dr. Mubaraque Quraishi* | 16 - 21 |
| 6. | Untouchability and Mahatma Gandhi<br>*Dr. Nalini Borkar* | 22 - 25 |
| 7. | Gandhi's Khadi - Huts to High Street<br>*Dr. Ravi N. Sakhare* | 26 - 29 |
| 8. | Mahatma Gandhi and the Beginning of Satyagraha in South Africa<br>*Dr. Sawan Giridhar Dharmpuriwar* | 30 - 34 |
| 9. | Gandhian Thought in Indian English Fiction<br>*Dr. Rajendra M. Pise* | 35 - 39 |
| 10. | Gandhi's Views on Democracy<br>*Dr. Surendra D. Pawar* | 40 - 44 |
| 11. | Political Thought of Mahatma Gandhi<br>*Dr. Vitthal Chauhan* | 45 - 51 |
| 12. | Mahatma Gandhi's Contribution to Education<br>*Prof. Avinash G. Yette* | 52 - 55 |
| 13. | Empowerment of Women - Mahatma Gandhiji<br>*Asst. Prof. Girish G. Gawai* | 56 - 60 |
| 14. | Gandhian Influence in Mulk Raj Anand's Novel Untouchable<br>*Asst. Prof. Vijay S. Ganvir* | 61 - 64 |
| 15. | Gandhian Concept of Truth and Non-violence<br>*Kavita N. Badwaik* | 65 - 69 |


ISBN - 978-93-86011-98-5

| | | |
|---|---|---|
| 33. | राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात महात्मा गांधीचे धर्म व सम्प्रदायवादासंबंधी विचार : एक विश्लेषण<br>*प्रा. डॉ. प्रमोद शंभरकर* | 133 - 137 |
| 34. | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक तत्वज्ञान<br>*डॉ. आर.एम. डोहणे* | 138 - 141 |
| 35. | म. गांधीचे सत्याग्रह संवंधी विचारांची आवश्यकता<br>*डॉ. आर.एन. मानकर* | 142 - 147 |
| 36. | महात्मा गांधी यांचे आरोग्य विषयक विचार<br>*प्रा.डॉ. राम चौधरी* | 148 - 153 |
| 37. | म. गांधीर्जीचे विचार आणि भारतीय लोकशाही मूल्यव्यवस्था<br>*प्रा. डॉ. रार्जेद्रप्रसाद पटले* | 154 - 157 |
| 38. | महात्मा गांधीर्जीचे सत्याग्रहविषयक विचारांचे अध्ययन<br>*डॉ. रार्जेद्र ओ. बेलोकार* | 158 - 160 |
| 39. | महात्मा गांधीर्जीचे जीवन विषयक तत्त्वज्ञान आणि वर्तमान स्थिती<br>*डॉ. एस .एन. रविदास* | 161 - 164 |
| 40. | महात्मा गांधीर्जीचे स्त्री विषयक विचार व भारतीय संवैधानिक कायदे<br>*प्रा. डॉ. संजय बी. गोरे* | 165 - 169 |
| 41. | महात्मा गांधीर्जीची ग्राम स्वराज्याची संकल्पना<br>*डॉ. विजया एच. राऊत* | 170 - 172 |
| 42. | राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे स्वातंत्र्याप्रति योगदान<br>*प्रा. आशिष आर. बोरकर* | 173 - 177 |
| 43. | गांधीर्जीचे तत्त्वज्ञान, जीवनशैली व वास्तवता<br>*प्रा. अनिल भांडारकर* | 178 - 182 |
| 44. | महात्मा गांधीचे उद्योजकात्मक विचार आणि राष्ट्रीय नेतृत्वाची भुमिका<br>*अर्चना एस. देशमुख* | 183 - 187 |
| 45. | महात्मा गांधी आणि ग्रामस्वराज<br>*प्रा. डी.के. कटके* | 188 - 191 |
| 46. | महात्मा गांधी यांची विश्वस्ताची कल्पना : एक दृष्टिकोन<br>*प्रा. हितेश मा. दडमल* | 192 - 195 |
| 47. | महात्मा गांधीचे आर्थिक विचार<br>*प्रा. एच.डी. जाधव* | 196 - 198 |
| 48. | राष्ट्रपिता महात्मा गांधीर्जीचे विचारदर्शन आणि जनतांत्रिक मुल्यव्यवस्था<br>*हरगोविंद टेंभरे* | 199 - 202 |
| 49. | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार<br>*प्रा. हेमंतकुमार बागडे* | 203 - 206 |


ISBN - 978-93-86011-98-5

# महात्मा गांधी आणि ग्रामस्वराज्य

**प्रा. डी.के. कटके**
लोकप्रशासन विभागप्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, गढी
ता. गेवराई, जि. बीड
E-mail : katedharmaraj@gmail.com

महात्मा गांधी हे केवळ नाव नाही तर एक तत्त्व प्रणाली आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या काळात देखील प्रत्येक समस्येचे उत्तर महात्मा गांधींच्या तत्त्वप्रणालीत मिळते. आज दारिद्र्य, निरक्षरता, अंधश्रद्धा, अस्पृश्यता, जातीयता, व्यसनाधिनता, बेरोजगारी, अस्वच्छता या समस्यांचे मुळ उत्तर हे महात्मा गांधींच्या तत्त्वप्रणालीत दिसून येते. भारतीय राज्यघटनेतील कलमांवर महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव दिसुन येतो. पंचायतराज व्यवस्थेत होत असलेले बदल, पंचायतराजचे सक्षमीकरण, ग्रामसभा, ग्रामस्वराज्य, पंचायतराजला मिळालेले अधिकार, देशातील स्वच्छता अभियान, व्यसनमुक्ती अभियान, स्वदेशी, स्वावलंबन, प्रशासन, आर्थिक नियोजन, निसर्गनिर्मित व्यवस्थापन या सर्व बाबींवर महात्मा गांधींच्या तत्त्वप्रणालीचा प्रभाव दिसून येतो. महात्मा गांधींनी अस्पृश्यता निवारणाची गरज प्रतिपादन केली होती. सहकार चळवळीबद्दल देखील त्यांनी विचार मांडलेले आहेत. महात्मा गांधी म्हणतात "देशाचे सामर्थ्य हे केंद्र सरकारवर अवलंबुन नसून ते ग्रामपंचायतीवर अवलंबुन आहे" म्हणून ग्रामीण भागाच्या विकासासाठी राजकीय व आर्थिक विकेंद्रीकरणावर ते भर देत असत. महात्मा गांधींनी देशाच्या उभारणीसाठी सर्वांगिण दृष्टीकोनातून भारतापुरते नव्हे तर सर्व जगासमोर सर्व पैलुतून आपले विचार ठेवले. त्यामध्ये सत्य, अहिंसा, बंधुभाव, कृषि विकास, ग्रामीण विकास, ग्रामोद्योग, राजकीय बाबी, शैक्षणिक विचार, गुणवत्ता वाढ, विचारांची देवाण घेवाण, शांती, संयम, सदाचार, स्वावलंबन, निर्भिडता, आरोग्य, न्याय इ. बाबींचा त्यात समावेश होतो. आईनस्टाईन म्हणतात, "महात्मा गांधी नावाचा माणूस या भुतलावर होऊन गेले असेल यावर भावी पिढ्यांचा विश्वास बसणार नाही." आज शहरीकरणाचा वाढता कल हा देशाच्या विकासासाठी योग्य नाही त्यासाठी महात्मा गांधींनी खेड्याकडे चला हा संदेश संपुर्ण देशाला दिला. आज शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष होत आहे आणि समस्यांची व्याप्ती वाढत चालली आहे या समस्येचे उत्तर महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्य विषयक विचारात असल्याचे दिसून येते. म्हणून महात्मा गांधींच्या ग्रामस्वराज्य विषयक विचारांचे पुर्नवलोकन करणे, पुर्नशोध घेणे या उद्देशाने या शोधनिबंधाची मांडणी केलेली आहे.

भारत हा प्राचीन काळापासून खेडयांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतात आजही जवळपास 6.5 लाख खेडी आहेत. देशातील 70% जनता ही खेड्यात असल्याचे दिसुन येते. भारत हा कृषि प्रधान देश म्हणून संपुर्ण जगभर ओळखला जातो. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा देखील शेती हाच आहे. गांधीजींच्या मते ग्रामव्यवस्था समर्थ असेल तरच समर्थ भारताची निर्मिती होईल म्हणून खेडी ही स्वयंपुर्ण झाली पाहिजेत स्वायत्त आणि स्वयंशासित झाली

# महात्मा गांधी आणि ग्रामस्वराज्य

**प्रा. डी.के. कटके**
लोकप्रशासन विभागप्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, गढी
ता. गेवराई, जि. बीड
E-mail : katkedharmaraj@gmail.com

महात्मा गांधी हे फक्त नाव नाही तर एक तत्व प्रणाली आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या काळात देखील प्रत्येक समस्येचे उत्तर महात्मा गांधीच्या तत्वप्रणालीत मिळते. आज दारिद्रय, निरक्षरता, अंधश्रध्दा, अस्पृश्यता, जातीयता, व्यसनाधिनता, बेरोजगारी, अस्वच्छता या समस्यांचे मुळ उत्तर हे महात्मा गांधीच्या तत्वप्रणालीत दिसून येते. भारतीय राज्यघटनेतील कलमांवर महात्मा गांधीच्या विचारांचा प्रभाव दिसुन येतो. पंचायतराज व्यवस्थेत होत असलेले बदल, पंचायतराजचे सक्षमीकरण, ग्रामसभा, ग्रामस्वराज्य, पंचायतराजला मिळालेले अधिकार, देशातील स्वच्छता अभियान, तंटामुक्ती अभियान, स्वदेशी, स्वावलंबन, प्रशासन, आर्थिक नियोजन, निसर्गनिर्मित न्यायदान या सर्व बाबींवर महात्मा गांधीच्या तत्वप्रणालीचा प्रभाव दिसून येतो. महात्मा गांधींनी अस्पृश्यता निवारणाची गरज प्रतिपादन केली होती. सहकार चळवळीबद्दल देखील त्यांनी विचार मांडलेले आहेत. महात्मा गांधी म्हणतात "देशाचे सामर्थ्य हे केंद्र सरकारवर अवलंबून नसून ते ग्रामपंचायतीवर अवलंबून आहे" म्हणून ग्रामीण भागाच्या विकासासाठी राजकीय व आर्थिक विकेंद्रीकरणावर ते भर देत असत. महात्मा गांधींनी देशाच्या उभारणीसाठी सर्वांगिण दृष्टीकोनातून भारतापुढेच नव्हे तर सर्व जगासमोर सर्व पैलुतून आपले विचार ठेवले. ज्यामध्ये सत्य, अहिंसा, बंधुभाव, कृषि विकास, ग्रामीण विकास, ग्रामोद्योग, राजकीय बाबी, शैक्षणिक विचार, गुणवत्ता वाढ, विचारांची देवाण घेवाण, शांती, संयम, सदाचार, व्यायाम, नितीमत्ता, आरोग्य, न्याय इ. बाबींचा त्यात समावेश होतो. आईनस्टाईन म्हणतात, "महात्मा गांधी नावाचा माणुस या भुतलावर होऊन गेले असेल यांवर भावी पिढयांचा विश्वास बसणार नाही." आज शहरीकरणाचा वाढता कल हा देशाच्या विकासासाठी योग्य नाही त्यासाठी महात्मा गांधींनी खेडयाकडे चला हा संदेश संपुर्ण देशाला दिला. आज शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष होत आहे आणि समस्यांची साखळी वाढत चालली आहे या समस्येचे उत्तर महात्मा गांधीजींच्या 'ग्रामस्वराज्य' विषयक विचारात असल्याचे दिसून येते. म्हणून महात्मा गांधींच्या ग्रामस्वराज्य विषयक विचारांचे पुर्नवलोकन करणे, पुर्नशोध घेणे या उद्देशाने या शोधनिबंधाची मांडणी केलेली आहे.

भारत हा प्राचीन काळापासून खेडयांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतात आजही जवळपास 5.5 लाख खेडी आहेत. देशातील 70% जनता ही खेडयात असल्याचे दिसून येते. भारत हा कृषि प्रधान देश म्हणून संपुर्ण जगभर ओळखला जातो. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा देखील शेती हाच आहे. गांधीजींच्या मते ग्रामव्यवस्था समर्थ असेल तरच समर्थ भारताची निर्मिती होईल म्हणून खेडी ही स्वयंपूर्ण झाली पाहिजेत स्वायत्त आणि स्वयंशासित झाली

ISBN - 978-93-86011-98-5

पाहिजे असे त्यांचे मत होते. गांधीजींनी 20 व्या शतकाच्या आंरभी 'हिंदू स्वराज्य' हे पुस्तक लिहले. त्यात महान भारतीयांची कल्पना केली या पुस्तकामध्ये त्यांनी 'आत्मनिर्भर खेडयालाच राष्ट्रीय आराखडयाचे एकक मानले' व ते पुढे असे म्हणतात ''खेडयांच्या स्थितीवर राष्ट्राच्या स्थितीचे प्रतिबिंब दिसेल.''

ग्राम स्वराज्याची व्याख्या सांगताना महात्मा गांधी म्हणतात, ''लोकांच्या संमतीने होणारे भारतवर्षातील शासन, लोकांच्या संमतीने हे शासन देशवासियांच्या मताधिकाराच्या प्रयोगावर आधारीत असेल. गांधीजींच्या मते लोकसंमती म्हणजे देशातील सर्वसामान्य जनता त्यामध्ये स्त्री असेल आणि पुरूषही असेल हे लोक या देशातील असतील किंवा या देशात येऊन स्थायिक झालेले असतील परंतु त्यांनी राष्ट्राच्या विकासात काहीतरी योगदान दिलेले असले पाहिजे. खरे ग्रामस्वराज्य हे थोडया लोकांकडून सत्ता प्राप्त केल्याने हस्तगत होणार नाही.''[1]

गांधीजींच्या मते, ''ग्रामस्वराज्य म्हणजे प्राप्त राज्य व समाजामध्ये कसल्याही प्रकारे जातिभेद आणि धर्मभेद असणार नाही. या समाजामध्ये केवळ शिक्षित व श्रीमंत लोकांचेच अधिकार असतील तसेच बहुसंख्य धार्मिक असलेल्या लोकांचीही सत्ता असणार नाही कोणी शोषण करणार नाही.''[2]

गांधीजींच्या मते, ग्रामस्वराज्य हे सर्वांसाठी सर्वांच्या कल्याणासाठी असेल, यात शेतकरी अपंग व मजुर यांचाही समावेश असेल. गांधीजींच्या ग्रामस्वराज्य या संकल्पनेमध्ये राजा, जमीनदार, शेतकरी, भूमिहीन, हिंदु, मुसलमान, ईसाई कृकृ यहुदी, पारसी हे सर्व समान असतील. त्यामध्ये जातिभेद, धर्मभेद वंशभेदासाठी कोणत्याही प्रकारचे स्थान असणार नाही कारण हे ग्रामस्वराज्य सर्व लोकांचे राज्य, न्यायाचे राज्य असेल.

महात्मा गांधीजींच्या मते ग्रामस्वराज्याची ही संकल्पना विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून अस्तित्वात आणता येते विकेंद्रीकरणाचा केंद्रबिंदु हा ग्राम असेल आणि त्या खेडयाच्या केंद्रस्थानी व्यक्ती असेल. प्रत्येक व्यक्ती आपल्या गावासाठी आत्मसमर्पण करण्यासाठी तयार राहील. गावातील लोक स्वयंस्फुर्तीने, सहकार्याच्या बळावर आपआपल्या गरजा भागवू शकतील याच माध्यमातून खेडी स्वयंपुर्ण आणि शांततेने आपले जीवन जगू शकतील.

महात्मा गांधींनी आपल्या ग्रामस्वराज्य संकल्पनेत श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देतात. व्यक्ती हा श्रीमंत असो की गरीब असो त्याने श्रम हे केलेच पाहिजेत. श्रम हे संपत्ती किंवा भांडवलापेक्षा कमी नाहीत. व्यक्तीने श्रमाची पुजा करावी सर्वांनी श्रम करण्यामुळे समाजातील वर्ग व्यवस्था नष्ट होईल श्रमामुळे मानवाला शारिरीक स्वास्थ देखील लाभेल. गांधीजी काम न करता सुट्टया घेणा–या लोकांचा तिरस्कार करतात व श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देतात.

ग्रामीण भागाची सक्षमता वाढवायची असेल तर आपणास चरखा, खादी व इतर ग्रामोद्योग ही गांधीची त्रिसुत्री ग्रामस्वराज्यात अत्यंत महत्वाची आहे. गांधीजी म्हणत शेतक–यांनी शेतीला जोडून इतर जोडधंदे सुरू करणे आवश्क आहेत. तसेच गावाच्या पुर्ननिर्माणासाठी खाद्यतेल, अखाद्य तेल, तांदुळ, मध, दाळी, खेळणी, चटई, साबण, पेंड, हातकागद, मृतचर्माची पादत्राणे, गुळ अशा अनेक वस्तुंचे ग्रामोद्योग सुरू करावेत, ग्रामीण भागात गुरे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्वाचा भाग आहेत. सहकारी तत्वांवर गुरांचे पालन केल्यास अधिक फायदा

ISBN - 978-93-86011-98-5

होईल. गुरांची जोपासणा योग्य प्रकारे करण्यात यावी. प्रत्येक गावात उपलब्ध दुधाच्या विक्रीसाठी सहकारी दुध पुरवठा केंद्र असावे. गांधीजी सांगतात की, आपल्या देशात पुष्कळ ठिकाणी शेतकरी चार चार, सहा सहा महिने रिकामा असतो त्याचा सर्व वेळ गुंतेल असे काम त्याला या काळात नसते तेव्हा तो विनाकारण वेळ काढीत असतो अशा रिकामपणात सुत काढणे हे वेळ जाण्यासाठी व अर्थ प्राप्तीसाठी चांगले साधन आहे. त्यामुळे दारिद्रय व बेकारी कमी होईल. कापूस चटकन पिंजुन काढण्यासाठी या 'चरखाचा' उपयोग करावा.

तसेच महात्मा गांधीना खेडयातील लोकांनी शहरी भागातील महागडा कपडा घेण्यापेक्षा खादीचा वापर केला तर पैसा वाचतो, गांधीजी म्हणतात, "खादी संपूर्ण हिंदुस्थानातील स्वातंत्र्याचे आणि समानतेचे प्रतिक आहे."[4] ग्रामीण भाग आर्थिक दृष्टया स्वावलंबी, समृध्द करण्यासाठी कापसाचे सूत काढून खादी बनवली तर ती वापरताही येते आणि सरकीचाही पैसा मिळतो. गांधीजी म्हणत, "माझ्या स्वप्नातील स्वराज्य गरीब माणसाचे स्वराज्य आहे." गांधीजींनी खेडयांच्या समग्र विकास करण्याचा विचार अत्यंत तपशिलवार व क्रांतीदर्शीपणे मांडला आहे.

गांधीजी म्हणतात, आर्थिक सक्षमता ही अहिंसक स्वातंत्र्याची गुरूकिल्ली आहे. खरे अर्थशास्त्र म्हणजे न्यायाचे अर्थशास्त्र होय. लोक जितके न्यायाने व सहचाराने वागायला शिकतील तितके त्यांना सुख लाभेल. बाकी सर्व व्यर्थ आहे नव्हे अनर्थकारी आहे. भल्याबु–या कोणत्याही मार्गानी श्रीमंत व्हा असे लोकांना शिकवणे म्हणजे त्यांना मोठा अपकार करणे होय[5]

समाजात स्त्रियांना असणारे कनिष्ठ स्थान गांधींजींना मान्य नव्हते. ग्रामविकासासाठी स्त्रियांना पुरेपुर स्वातंत्र्य दिले जावे. स्त्री पुरूषांचा दर्जा समान असावा एवढेच नाहीतर स्त्री पुरूष एकमेकांस पुरक असावेत. देशाला आर्थिक व नैतिक समस्येतुन वाट काढण्याचे सामर्थ्य स्त्रियांमध्ये आहे त्यासाठी त्यांचे सामाजिक जीवन सुधारणे गरजेचे आहे. जे ग्रामस्वराज्यात अत्यंत महत्वाचे आहे.

महात्मा गांधीजींनी ग्राम स्वराज्यासंबंधी जातीय ऐक्य, अस्पृश्ता निवारण, दारूबंदी, खादी, इतर ग्रामीण व्यवसाय, प्रौढ शिक्षण, स्त्रियांचा उध्दार, आरोग्य शिक्षण, राष्ट्रभाषा प्रचार, स्वकीय भाषा प्रेमाचा विकास, आर्थिक समस्येसाठी कार्य असा रचनात्मक कार्यक्रम मांडलेला आहे. जो आज एकविसाव्या शतकात जगातील सर्व देशांना एक मार्गदर्शक असा आहे तसाच तो समर्थ राष्ट्र उभारणीसाठी उपयुक्त आहे.

आज खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या काळात टिकाकार महात्मा गांधीजींच्या विचारावर टिका करत असले तरीही आज देशात विकासाचे कोणतेही मॉडेल हे गांधी विचार सरणीने प्रेरीत असल्याचे दिसुन येते संपूर्ण जग गांधीच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेकडे आदर्शतेने पाहते. जे भारतात प्रत्ययास आले. जसे की अण्णा हजारेंच्या राळेगण सिध्दीचा विकास, पोपटराव पवारांचे हिवरे बाजार इ. गावे आज संपुर्ण जगभरात प्रसिध्दीस आहेत. जगभरातून लोक येथे येऊन ग्रामविकासाचा अभ्यास करतात. ही गावे गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेच्या विचारांच्या प्रेरणेतून घडलेली आहेत. बिहार सारखे राज्य आज व्यसनाधिनतेपासून वाचण्यासाठी संपुर्ण दारूबंदीचा निर्णय घेते. 73 वी व 74 वी घटनादुरूस्ती पंचायतराज

ISBN - 978-93-86011-98-5

सक्षमीकरणसाठी करण्यात आली. महात्मा गांधीच्या विचारांच्या प्रेरणेतून संपुर्ण देशभर स्वच्छ भारत अभियान राबवले जात आहे. विविध विद्यापीठांतून प्रौढशिक्षणाचा प्रसार, प्रचार कार्य सुरू आहे. लघु, ग्रामउद्योगांसाठी सवलतीचे धोरण, आरोग्य विषयक कार्यक्रम, महाराष्ट्रात महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान जे गावातील लोकांमध्ये शांतता व सौदार्याचे संबंध ठेवण्यास पुरक आहे. श्री. पाळेकर गुरूजी यांनी 'झिरो बजेट शेती' हे जे आज आदर्श देशासमोर ठेवले आहेत ते महात्मा गांधींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेची फलश्रुती आहे. देशातील 70% जनता खेडयां-मध्ये राहते त्यांना त्यांच्या समस्येतुन मुक्त करावयाचे असेल तर अधिकाधिकपणे महात्मा गांधींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेची प्रेरणा घेवून खेडी स्वयंपुर्ण झाली पाहिजेत ज्यातुन समर्थ भारताची उभारणी होईल म्हणुन आज गरज आहे महात्मा गांधींच्या विचारांने प्रेरीत होऊन कार्य करण्याची, जी जगातील सर्व समस्यांचे उत्तरे शोधू शकेल.

## संदर्भ


1. नागेश्वर प्रसाद – गांधी का अराजकता वाद
2. गर्गे स. मा. – भारतीय समाजविज्ञान कोश खंड 4, साज विज्ञान मंडळ पुणे 1990.
3. गांधीजी, पंचायतराज नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, पृ.क्र. 12
4. कित्ता पृ.क्र. 20
5. गंगाप्रसाद अग्रवाल – हिंद स्वराज्य, मार्गदर्शक दस्ताऐवज, साम्य योग साधना प्रकाशन, धुळे, डिसेंबर 2005 पृ.क्र. 6
6. दाभोळकर देवदत्त – लोकशाही समाजवाद, संगम प्रकाशन, पुणे 1960.
7. गांधी का राजनैतिक चिंतन
8. डॉ. भा.ल. भोले – आधुनिक भारतातील राजकीय विचार.